अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# राजकारण्याविरुद्धचा हा आततायीपणाच

गेल्या काही वर्षांमध्ये समाजात राजकारण्यांविषयी एक वेगळाच मत्सरभाव वाढू लागलेला दिसतो. राजकारण्यांविषयी समाजात राग आहे ही गोष्ट खरी. पण तो राग व्यक्त करण्यासाठी जी पध्दत वापरली जात आहे, ती अत्यंत अशोभनीय आणि सामाजिक सभ्यतेचा एकाअर्थी विध्वंस करणारी म्हणावी लागेल. गेल्याच आठवड्यात राज्याचे मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या तोंडावर शाई फेकण्याचा प्रकार झाला. त्यापाठोपाठ विदर्भात अजित पवारांवर चप्पल भिरकवण्याची घटना घडली. महाराष्ट्रामध्ये असले प्रकार यापूर्वी कधी झालेले नाहीत. परंतु या ताज्या दोन घटनांनी महाराष्ट्रातही असभ्यवृत्ती वाढत असल्याचे दिसून येते. याआधी दिल्ली किंवा उत्तर भारतामध्ये असल्या घटना वारंवार घडल्याचे दिसून येते. माजी मंत्री चिदंबरम यांच्यावरही दिल्लीत अशाच प्रकारे बूट फेकण्याचा प्रकार घडला होता. त्यानंतर काँग्रेसचे केंद्रीय प्रवक्ते द्विवेदी यांच्यावरही असाच प्रयोग केला गेला. त्यानंतर शाई फेकण्याच्या नव्या विकृतीने जन्म घेतला आणि आम आदमी पार्टीच्या दोन नेत्यांवर शाई फेकण्याच्या घटना घडल्या. मुळात राजकारणी व्यक्तीचा समाजाशी किंवा समुदायाशी, गर्दीशी थेट संबंध येतो. वर्षातल्या ३६० दिवसांपैकी किमान ३०० दिवस ते वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये किंवा उपक्रमांना हजर राहून थेट समाजाशी संपर्क साधत असतात. राजकारण हे समाजसेवेचेच माध्यम असल्यामुळे लोकांशी नित्य संपर्क हे त्याचे पहिले मोठे लक्षण ठरते.पण अलीकडच्या या प्रकारांनी राजकारण्यांमध्ये एक वेगळीच भीती निर्माण केली आहे. याची कारणे काहीही असली लोकांचा राजकारण्यांविषयी अविश्वास किंवा संताप असला तरीदेखील लोकशाही समाजव्यवस्थेत या असभ्यपणाला अजिबात स्थान उरत नाही. लोकसभा निवडणुकीच्या काळात तर आणखी एका वेगळ्याच प्रकाराने उच्चांक गाठला होता. आम आदमी पार्टीचे अरविंद केजरीवाल यांना प्रचार मिरवणुकांच्या काळात अशाच माथेफिरूंकडून दोनवेळा थपडा खाव्या लागल्या. थेट अंगावर धावून जाण्याचा किंवा मारहाण करण्याचा हा प्रकार असाच वाढत जाणार असेल तर या विकृतीला रोखावे लागेल. त्यामागची कारणे तर शोधावी लागतीलच. परंतु लोकशाहीतल्या स्वातंत्र्याचा गैरफायदा घेतला जातो आहे की काय? त्यामध्ये स्वैराचार वाढतो आहे काय हेदेखील तपासले गेले पाहिजे.

## सत्तेची झूल बाजूला ठेवा

आपला देश लोकशाही व्यवस्थेच्या माध्यमातून नागरिकांना अनेक प्रकारची स्वातंत्र्ये बहाल करतो. सामान्य नागरिक त्याचा उपभोग तर घेतो. परंतु राजकारणात असलेली व्यक्ती किंवा नेते हेदेखील त्याचा गैरफायदा घेतात. त्यांच्याकडे असलेल्या अधिकाराचा आणि सत्तेचा ते मोठ्या प्रमाणावर गैरवापर करतात किंबहुना राजकारणामध्ये अशा प्रकारची झुंडशाही वाढीला लागते आहे. सत्ता किंवा अधिकार म्हणजे आपल्याला वाटेल ते करण्याचा सर्वाधिकार असे एक समीकरण राजकारणातल्या झुंडशाहीने तयार केले. सामान्य माणसाच्या मनात ज्या गोष्टीविषयी चीड निर्माण झाली, त्या आपल्या मतावर निवडून जाणारे राजकारणी कधीही सामान्य माणसासारखे वावरताना दिसत नाहीत. त्यांच्या वागण्याबोलण्यामध्ये एक विचित्र प्रकारची रग आणि अरेरावी दिसते. एखादा माणूस आपली तक्रार घेऊन त्यांच्याकडे जातो त्यावेळेला त्याची हे राजकारणी तितक्याच सभ्यपणे दखल घेत नाहीत. अनेक वेळेला तर सामान्य माणसाच्या तक्रारीची टिंगल होते. काही वेळेला थट्टामस्करी होते. सातत्याने अन्याय झालेला असल्याने मेटाकुटीला आलेला हा सामान्य माणूस आतातरी आपल्याला न्याय मिळेल अशा आशेने या राजकारण्यांच्या तथाकथित दरबारात जातो. तिथे त्याचा सन्मान तर दूरच राहिला. परंतु वारंवार अपमान मात्र सहन करावा लागतो. कुठेतरी हा अन्याय वाढत जातो आणि दबलेला हा सगळा असंतोष केव्हा तरी उफाळून येतो. त्यातून मग मोठे आंदोलन तरी उभे राहते किंवा व्यक्तिगत पातळीवर अशा प्रकारचे शाई फेकण्याचे, चप्पल फेकण्याचे किंवा गालांवर थपडा मारण्याचे प्रकार घडतात.खरे तर अत्यंत कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत वावरणाऱ्या नेत्यांपर्यंत सामान्य माणसाला पोहचताच येत नाही. अशी कोणतीच व्यवस्थाही नाही. आणि मग या सुरक्षा व्यवस्थेला धाब्यावर बसवून चप्पल किंवा बूट फेकण्याचा आततायीपणा घडत असला पाहिजे. प्रामुख्याने राजकारण्यांच्या बाबतीतच हा प्रकार का घडतो, याचा संबंधितानीच नीट विचार केला पाहिजे. या प्रकारांचे कोणीही समर्थन करणार नाही. मात्र त्याची कारणे शोधण्याची जबाबदारी राजकारण्यांनाही टाळता येणार नाही. आपण पूर्णपणे निर्दोष आहोत, या समजूतीत न राहता समाजामध्ये निर्माण होणाऱ्या या दोषांचे निराकरण आपल्या रोजच्या वागण्याबोलण्यातून करता येईल का, याचा त्यांना निश्चितच विचार करावा लागेल.

## विनम्रता आवश्यक

समाजातला हा रोष आवरण्याची आवश्यकता आहे. त्याची सुरुवात समाजाशी सुसंवाद स्थापून करता येईल. राजकारण्यांनी सत्तेची आणि अधिकाराची झूल बाजूला ठेवून थोडे समाजात वावरायला शिकले पाहिजे. अर्थात कोणतीही व्यक्ती कशी असेल किंवा समाजकंटक किंवा हितशत्रू या गोष्टीचा कसा गैरफायदा घेतील हे सांगता येत नाही. परंतु योग्य ती सुरक्षा व्यवस्था पाळून किंवा दक्षता घेऊन समाजाबरोबर सुसंवाद निर्माण होऊ शकतो. सातत्याने आपलेच खरे करण्याची सवय राजकारण्यांना लागलेली आहे. आम्ही सांगू ती पूर्वदिशा अशा या एकाधिकार शाहीविरुध्द लोकांच्या मनात चीड निर्माण होत आहे. आपल्याला मिळालेले पद हे समाजाने दिलेले आहे. त्या समाजाविषयी आपण कृतज्ञ राहिले पाहिजे. कोणताही राजकीय किंवा स्वार्थी हेतू मनात न ठेवता समाजात मिळूनमिसळून वागण्याची प्रवृत्तीच आता राजकारण्यांमध्ये राहिलेली नाही. लाल दिव्याच्या गाड्या आणि आजूबाजूचा पोलीस फौजफाटा असे स्वत:चेच प्रदर्शन करून घेण्याची राजकारण्यांना सवय लागल्यामुळे लोकांचा त्यांच्याविरुध्द राग वाढत चालला आहे. अर्थात हा राग ते वेगळ्या पध्दतीने व्यक्त करू शकतात. त्यासाठी शाई किंवा चप्पल फेकण्याचा हिंसक असभ्य मार्ग स्वीकारण्याची गरज नाही. शेवटी शालीनता किंवा विनम्रता यामधूनच काहीतरी चांगले घडून येते. याचे समाजाने आणि राजकारण्यांनी कायम स्मरण ठेवले पाहिजे.